**<u>प्रेसनोट</u> दिनांक २३/०६/२०१९**

**दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.**

**<u>"जेष्ठ नागरिकांच्या घरात चोरी करणाऱ्या चोराच्या  तात्काळ मुसक्या आवळुन जेष्ठांना दिला "भरोसा"</u>**

प्रत्येक आई वडीलांना आपली मुले खुप शिकावी आणि मोठी झाल्यावर परदेशात जाऊन त्यांनी मोठ्या पदावर काम करावं अशी अपेक्षा असते. तशी अपेक्षा पुण्यातील पर्वती परिसरात राहणाऱ्या मित्र मंडळ कॉलनी मधील मुग्धा मधुकर साळवी आणि मधुकर साळवी या दाम्पत्याला वाटले त्याप्रमाणे त्यांनी आपल्या दोन्ही मुलींना शिकवले त्यादोघी सध्या परदेशात वास्तव्यास आहेत. या दाम्पत्याचे वय ७५ च्या आसपास असल्याने त्यांना आता जास्त हालचाल करता येत नसल्याने व मधुकर साळवी सतत आजारी असल्याने त्यांच्या देखभालीसाठी एका खाजगी नर्सिंग ब्युरोमधुन यशवंत नरसिंग साकिनाल,वय २८ रा. ४८३ गंजपेठ, महात्मा फुले पेठ, पुणे याला त्यांची शुश्रुषा करण्यासाठी नेमण्यात आले होते. त्याने काही दिवस व्यवस्थित काम केले परंतु काही दिवसापासुन तो अचानक कामावर येणे बंद झाले. दि.१५/०६/१९ रोजी त्यांनी घरातील कपाटातील लॉकर चेक केले असता त्यांना सोन्याचे दागिने व रोख ८,०००/- रु मिळुन आले नाही. त्यांनी संपुर्ण घरात शोध घेतला व घरातील कामकरणाऱ्या मोलकरणीकडे चौकशी केली त्याच प्रमाणे केअर टेकर यशवंत साकिनाल यांच्याकडे चौकशी केली असता कोणीही काहिच माहिती सांगत नाही म्हटल्यावर श्रीमती मुग्धा मधुकर साळवी,वय ६९ वर्षे रा. मित्र मंडळ कॉलनी, पर्वती पुणे यांनी दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे अज्ञात चोरट्या विरुध्द तक्रार नोंदविली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी जेष्ठ नागरिकांच्याबाबत घेडलेल्या गुन्ह्याकडे अत्यंत गांभीर्यपुर्वक पाहुन तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक कुलदिप संकपाळ यांना त्या वृध्द दाम्पत्याकडे काम करणाऱ्या सर्व कामगारांकडे चौकशी करण्यास सांगितले. या चौकशीमध्ये केअर टेकर म्हणुन कामकरणाऱ्या यशवंत साकिनाल याच्याकडे सखोल विचारपुस करुन विश्वासात घेऊन तपास केला असता त्याने वृध्द दाम्पत्याच्या घरी चोरी केल्याचे कबुल केले. त्याला अटक करुन अटक मुदतीत त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने श्रीमती मुग्धा साळवी यांच्या कपाटातील लॉकर मधुन एकुण १३ तोळे सोने चोरल्याचे कबुल केले व ते सोने त्याच्याकडुन जप्त करण्यात आले आहे.

सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक कुलदिप संकपाळ, पोलीस हवालदार तानाजी निकम, रविंद्र फुलपगारे, पोलीस नाईक सुधीर घोटकुले, महेश गाढवे, सोमेश्वर यादव, शरद राऊत, विकास कदम, अमित सुर्वे, शिवाजी क्षीरसागर, अमोल लोहार, अक्षयकुमार वाबळे व राहुल ओलेकर यांनी केली आहे.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस ठाणे, पुणे शहर.